**प्रसिध्दी मजकूर**

नोंदणी क्रमांक – ७३४८, दि. २३/११/१९३५ परवाना क्रमांक – यु. बी. डी. एम. एच. ६२८ पी. दि. ३१/१०/१९८६

# दि देवगड अर्बन को– ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, देवगड

दिवाणी न्यायालयाजवळ, मु. पो. ता. देवगड जि. सिंधुदुर्ग

फोन : (०२३६४) २६२०५९/२६२२३८

**e- mail** - devgadurbanbankltd@yahoo.in

---

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**(फक्त सभासदांसाठीच)**

दि देवगड अर्बन को–ऑप. बँक लि, देवगड या संस्थेच्या सभासदांची ८६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **गुरूवार दिनांक ३०/०९/२०२१ रोजी दुपारी ठीक ०३.०० वा. बँकेचे प्रधान कार्यालय इमारत, देवगड येथील "सभासद भवन" येथून** बँकेचे मा. अध्यक्ष श्री. दिलीप धोंडू आचरेकर यांचे अध्यक्षतेखाली कोविड–१९ विषाणू प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर मा. महाराष्ट्र शासन यांच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग यांच्या सूचनेनुसार दृकश्राव्य (Video Conferencing) या माध्यमातून https://ducbankagm2021.ruha.co.in या लिंकद्वारे घेतली जाणार आहे. तरी सर्व सभासदांनी वेळीच सहभागी व्हावे, हि विनंती.

### ❑ सभेपुढील विषय ❑

१. दि. २७/०२/२०२१ रोजी झालेल्या बँकेच्या ८५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून ते कायम करणे.
२. दि. ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाचा बँकेच्या कामकाजाचा अहवाल, ताळेबंद व नफातोटा पत्रक स्वीकृत करणे आणि नफा वाटणीस मान्यता देणे.
३. सन २०२०–२०२१ चा वैधानिक लेखापरिक्षण अहवाल, तसेच मागील सन २०१९–२०२० च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालावरील दोष–दुरूस्ती अहवाल यावर विचार करणे व स्वीकृत करणे.
४. भारतीय रिझर्व्ह बँकेने मान्यता दिलेल्या सनदी लेखापाल संस्थेची नेमणूक सन २०२१–२०२२ या आर्थिक वर्षासाठी बँकेचे वैधानिक लेखापरिक्षक म्हणून करणे व याकामीचे मानधन ठरविणे.
५. सन २०२२–२०२३ साठी अंतर्गत लेखापरिक्षक तसेच टॅक्स ऑडीटर यांची नेमणूक करणे व मानधन ठरविणे.
६. सन २०२१–२०२२ करीता संचालक मंडळाने तयार केलेल्या उत्पन्न व खर्च यांच्या अंदाजपत्रकाची माहिती घेणे.
७. बँकेच्या सभासदांचे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजनाबाबत निर्णय घेणे.
८. मा. अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्यावेळी येणा–या विषयांचा विचार करणे.

**विशेष सूचना**:– गणसंख्येअभावी ही सभा तहकूब झाल्यास त्याचदिवशी त्याचठिकाणाहून अर्ध्या तासांनतर सुरू करण्यात येईल व अशा सभेला गणसंख्येची अट राहणार नाही.

**संचालक मंडळाच्या आदेशावरून,**

**सही/–**

**श्री. भरत शि. चव्हाण**

मुख्य कार्यकारी अधिकारी

स्थळ : देवगड

दिनांकः– ०७/०९/२०२१

## ❑ सभासदांसाठी सूचना ❑

१. या वार्षिक सभेमध्ये ऑनलाईन पध्दतीने दिलेल्या लिंकवर सहभागी होण्याकामी बँकेच्या सभासदांनी सभासद नंबर आणि मोबाईल नंबर यांचा वापर करावयाचा असल्याने सभासदांनी त्यांचा अधिकृत मोबाईल नंबर दि. २४/०९/२०२१ पर्यन्त बँकेच्या प्रधान कार्यालय अथवा नजीकच्या शाखा कार्यालयाकडे कळविणे आवश्यक आहे.

२. ज्या सभासदांना विषय पत्रिकेतील विषयासंबंधी माहिती विचारावयाची असेल त्यांनी दि. २४/०९/२०२१ पर्यन्त प्रधान कार्यालयाकडे लेखी कळवावे म्हणजे माहिती काढून ठेवणे सोयीचे होईल.

३. सन २०२०—२०२१ साठीचा ताळेबंद व नफा तोटा पत्रक आणि नफावाटणीपत्रक बँकेचे प्रधान कार्यालय, देवगड व सर्व शाखांचे नोटीस बोर्डवर दि. १६/०९/२०२१ रोजी प्रसिध्द केले जाईल.

सही/—

**श्री. भरत शि. चव्हाण**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**दि देवगड अर्बन को—ऑप. बँक लि., देवगड**